**प्रसिध्दी पत्रक** दिनांक 25/08/2025

**आरोपी खाजगी ईसम किशोर गोरख जाधव**, वय 38 वर्ष, **व्यवसाय,मजुरी व एजंट तहसील कार्यालय, खुलताबाद, छत्रपती संभाजीनगर** यांनी तक्रारदार यांची संजय गांधी निराधार योजनेची फाईल तहसीलदार, खुलताबाद यांचेकडून मंजूर करून देण्याकरिता 2,000/- (दोन हजार रुपये) रुपये लाच मागणी केल्यामुळे आरोपी खाजगी ईसम लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळयात.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस टाणे | पोलीस टाणे खुलताबाद, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे. |
| आरोपी यांचे नाव व पत्ता | **आरोपी खाजगी ईसम** - किशोर गोरख जाधव , वय 38 वर्ष, व्यवसाय,मजुरी व एजंट तहसील कार्यालय, खुलताबाद, छत्रपती संभाजीनगर. रा. सुलीभंजन, ता. खुलताबाद, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागणी रक्कम | 2,000/- ( दोन हजार रुपये) |
| लाच स्विकृती रक्कम | लाच रक्कम स्विकारली नाही. |
| सापळा अधिकारी | श्री.संतोष तिगोटे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर. |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार हया विधवा असून त्यांची संजय गांधी निराधार योजने ची फाईल तहसील कार्यालयातून मंजूर करून देण्यासाठी आरोपी खाजगी इसम हे तक्रारदार यांच्याकडे 2000/- (दोन हजार) रुपये लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार दिनांक 18/08/2025 रोजी ला.प्र.वि.कार्यालय छत्रपती संभाजी नगर येथे समक्ष हजर राहून तक्रारदार यांनी दिली होती. |
| थोडक्यात माहिती | दिनांक 19/08/ 2025 रोजी तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीची शासकीय पंच समक्ष आरोपी खाजगी इसम यांच्याकडे तक्रारदारास पाठवून पडताळणी केली असता आरोपी यांनी तक्रारदार यांच्याकडे संजय गांधी निराधार योजनेची फाईल तहसीलदार, खुलताबाद यांचेकडून मंजूर करून देण्याकरिता 2000/- रुपयाची लाच मागणी करून स्वीकारण्याचे कबूल केले.<br>आरोपी खाजगी इसम यांच्या लाच मागणी पडताळणी नंतर दिनांक 25/08/2025 रोजी शासकीय पंच समक्ष तहसील कार्यालय खुलताबाद चे परिसरात सापळा कारवाई आजमावली असता आरोपी खाजगी इसम यांनी तक्रारदार यांचेवर संशय घेऊन तक्रारदार यांचे कडून लाचेची रक्कम स्वीकारली नाही व तक्रारदार यांचे संजय गांधी निराधार योजनेची फाईल घेऊन जात असताना आरोपी खाजगी इसम यांना ताब्यात घेण्यात आले आहे.<br>आरोपी खाजगी इसम यांच्या विरुध्द पोलीस ठाणे खुलताबाद, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु असुन नमुद गुन्हयाचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर मार्फत करण्यात येत आहे. |

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी कांगणे, अपर पोलीस अधीक्षक श्री.शशिकांत सिंगारे यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक, श्री.संतोष तिगोटे यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी पोलीस हावलदार राजेंद्र सिनकर, अशोक नागरगोजे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर

ई- मेल :-1)spacbaurangabad@mahapolice.gov.in 2) dysp.acbcsn@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,

पोलीस अधीक्षक :- 90110 92777 अपर पोलीस अधीक्षक :- 9923102205

पोलीस उप अधीक्षक :- 9923247986


(संतोष तिगोटे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
छत्रपती संभाजीनगर